D:\pp\KANDALVAN\KANDALVAN Noting & Letter. (Autosaved).docx


महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**

हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖

❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/६१४०८/२०२० दिनांक :-२४/९/२०२०

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**विषय:- कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत**

**Chopping of mangroves stretch at Pagote Uran.**

**(श्री.बी.एन.कुमार, श्री.नंदकुमार पवार )**

अर्जदार श्री.बी.एन.कुमार, श्री.नंदकुमार पवार यांनी उरण तालुक्यातील पागोटे येथे कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडून या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मशा/ जमीन/ अ-०३/ कांदळवन/ ई-मेल/ तक्रार/ पवार/ २८/८/२०१९, दि.०४/०९/२०१९अन्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी तहसिलदार उरण यांचेमार्फत चौकशी करुन दिनांक २१/१२/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

अर्जदार श्री.बी.एन.कुमार व श्री.नंदकुमार पवार यांनी उरणं तालुक्यातील पागोटे येथील कांदळवन ऱ्हास होत असल्याबाबतच्या तक्रारीबाबत दि.२२/११/२०१९ रोजी परिक्षेत्र वन अधिकारी उरण, मंडळ अधिकारी उरण, तलाठी सजा नवघर, श्री.बी.एन.कुमार व पागोटे येथील रहिवासी यांचेसमवेत संयुक्त स्थळपाहणी करण्यांत आली होती व त्यांच्याकडील अहवालानुसार तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केलेल्या ठिकाणी आजमितीस नाश झाल्याचे आढळून आल्यामुळे उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी त्यांचेकडील पत्र दि.१०/१२/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करुन अहवाल सादर करणेबाबत तहसिलदार उरण यांना कळविणेत आले होते.

त्याअनुषंगाने, तहसिलदार उरण यांनी त्यांचेकडील पत्र दि.२०/१२/२०१९ मध्ये नमूद केलेनुसार पुढीलप्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे. मौजे पागोटे येथील एन.एम.एस.ई.झेड. (नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र) च्या मालकीचे एकूण सुमारे ७ ते ८ एकर क्षेत्रापैकी ३ एकर जागेवरील कांदळवन तोडलेल्या स्थितीत दिसून आले. सदर बाबतीत दि.२२/११/२०१९ रोजी मंडळ अधिकारी उरण यांनी सविस्तर पंचनामा केला असून तेथील परिस्थितीवरुन एन.एम.एस.ई.झेड. च्या पदाधिकाऱ्यांनी तेथील कांदळवन तोडून पर्यावरणाची हानी केल्याचे निदर्शनास आल्याने सदर बाबत एन.एम.एस.ई.झेड. या कंपनीच्या संबधित पदाधिकारी यांचेवर पोलिस स्टेशन उरण येथे FIR NO. ०२८९/२०१९, दिनांक १९/१२/२०१९ वेळ २३.३७ वाजता गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. सदर बाबतील सोबत प्रत्यक्ष नमूद ठिकाणी केलेला जबाब पंचनामा व FIR NO. ०२८९/२०१९ जोडून सादर केला आहे.

तसेच, परिक्षेत्र वन अधिकारी उरण यांचेकडील दिनांक १९/१२/२०१९ रोजीचे पत्रानुसार प्रति हेक्टरी Replantation ची संख्या ही ४४४४ असल्याने ३ एकरा करिता एकूण ५३३३ कांदळवनाची झाडे लागवड होणे आवश्यक असलेबाबत कळविले आहे.

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालानुसार वस्तुस्थिती बाबत अहवाल व मंडळ अधिकारी उरण यांचेकडील अहवाल, जबाब, पंचनामा व मागील ३ वर्षातील Google Images, MRSAC नकाशा, FIR NO. ०२८९/२०१९ माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडला आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

(विशाल दौंडकर)
तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड